# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहर बस संचालना करीता वाहक हा महत्वाचा घटक
**{परिवहन विभाग}** असल्यामुळे यांचा पुरवठा रितसर निविदा काढून दि. २६ /०६/ २०१७ रोजी मे. यूनिटी सेक्यूरिटी सर्व्हिसेस , मे. डिम्टस व म.न.पा यांचे मध्ये करारनामा करण्यात आला. या करारनाम्या नूसार मे. यूनिटी सेक्यूरिटी सर्व्हिसेस , नागपूर यांचा तिन वर्षाचा कार्यकाळ दि. २७ /०६/ २०२० रोजी संपल्यामूळे त्यांना करारनाम्यातील अट क्र. ३.१ नूसार परिवहन समिति ठराव क्र .६० दि. १६ /०३/ २०२१ अन्वये करारनाम्यातील जून्याच अटी व शर्तीवर मा. आयूक्त यांच्या दि. १४ /०९/ २०२१ रोजीच्या मंजूरीने दोन वर्षाची मूदतवाढ देण्यात आली .

कोव्हीड - २०१९ च्या जागतिक संसर्गा मूळे शहर बस सेवा दि. २३ /०३/ २०२० पासून २१९ दिवस खोळंबलेली होती. या काळाची प्रतिपूर्ती करण्यास्तव, ज्या प्रमाणे बस ऑपरेटर्स यांना या कालावधीचा लाभ देण्यात आलेला आहे त्याच धर्ती वर परिवहन समितिने ठराव क्र. ६१ दि. १६ /०३/ २०२१ व महासभेने ठराव क्र. १५० दि. ०८ /०९/ २०२१ व मा. आयूक्त यांच्या दि. २० /०४/ २०२२ रोजीच्या मंजूरीने करारनाम्यातील जून्याच अटी व शर्तीवर मंजूरी देण्यात आली आहे. दि. १० /०१/ २०२३ रोजी मा. आयूक्त यांनी वाहक पुरवठा काणा-या एजंसीच्या नेमणूकीकरीता घेतलेल्या आढावा बैठकी मध्ये मे. डिम्टस यांना काही मुद्दे समाविष्ट करून सूधारीत आर. एफ. पी. सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यावर मे. डिम्टस द्वारे काम सूरू आहे.

दरम्यान मे. यूनिटी सेक्यूरिटी सर्व्हिसेस यांचा कार्यकाळ दि. ०९ /०२/ २०२३ ला संपुष्टात येत असल्यामुळे व शहर बस सेवा अखंडीत सूरू राहण्याकरिता यांना ०६ महिन्याची मूदतवाढ करारनाम्यातील जून्याच अटी व शर्तीवर किंवा नविन आर. एफ. पी. प्रकाशित होउन नविन वाहक पुरवठा कंत्राटदार निश्चित होऊन कार्यादेश देणे, यांपैकी जो कालावधी आधी असेल त्या कालावधी करिता करारनाम्यातील अटी व शर्तीवर मूदतवाढ देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 265/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 14/02/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार परिवहन व्यवस्थापक, परिवहन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहर बस संचालना करीता वाहक हा महत्वाचा घटक असल्यामुळे यांचा पुरवठा रितसर निविदा काढून दि. २६ /०६/ २०१७ रोजी मे. यूनिटी सेक्यूरिटी सर्व्हिसेस , मे. डिम्टस व म.न.पा यांचे मध्ये करारनामा करण्यात आला. या करारनाम्या नूसार मे. यूनिटी सेक्यूरिटी सर्व्हिसेस , नागपूर यांचा तिन वर्षाचा कार्यकाळ दि. २७ /०६/ २०२० रोजी संपल्यामूळे त्यांना करारनाम्यातील अट क्र. ३.१ नूसार परिवहन समिति ठराव क्र. ६० दि. १६ /०३/ २०२१ अन्वये करारनाम्यातील जून्याच अटी व शर्तीवर मा. आयूक्त यांच्या दि. १४ /०९/ २०२१ रोजीच्या मंजूरीने दोन वर्षाची मूदतवाढ देण्यात आली .

कोव्हीड - २०१९ च्या जागतिक संसर्गा मूळे शहर बस सेवा दि. २३ /०३/ २०२० पासून २१९ दिवस खोळंबलेली होती. या काळाची प्रतिपूर्ती करण्यास्तव, ज्या प्रमाणे बस ऑपरेटर्स यांना या कालावधीचा लाभ

देण्यात आलेला आहे त्याच धर्ती वर परिवहन समितिने ठराव क्र. ६१ दि. १६ /०३/ २०२१ व महासभेने ठराव क्र. १५० दि. ०८ /०९/ २०२१ व मा. आयूक्त यांच्या दि. २० /०४/ २०२२ रोजीच्या मंजूरीने करारनाम्यातील जून्याच अटी व शर्तीवर मंजूरी देण्यात आली आहे. दि. १० /०१/ २०२३ रोजी मा. आयूक्त यांनी वाहक पुरवठा काणा-या एजंसीच्या नेमणूकीकरीता घेतलेल्या आढावा बैठकी मध्ये मे. डिम्टस यांना काही मुद्दे समाविष्ट करून सूधारीत आर. एफ. पी. सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यावर मे. डिम्टस द्वारे काम सूरू आहे.

दरम्यान मे. यूनिटी सेक्यूरिटी सर्व्हिसेस यांचा कार्यकाळ दि. ०९ /०२/ २०२३ ला संपुष्टात येत असल्यामुळे व शहर बस सेवा अखंडीत सूरू राहण्याकरिता यांना ०६ महिन्याची मूदतवाढ करारनाम्यातील जून्याच अटी व शर्तीवर किंवा नविन आर. एफ. पी. प्रकाशित होउन नविन वाहक पुरवठा कंत्राटदार निश्चित होऊन कार्यादेश देणे, यांपैकी जो कालावधी आधी असेल त्या कालावधी करिता करारनाम्यातील अटी व शर्तीवर मूदतवाढ देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**